# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**दूरध्वनी क्रमांक-**
**०२०- २५६२११८१**
**Email :- dyrelg@unipune.ac.in**

**शैक्षणिक पात्रता विभाग**
**गणेशखिंड पुणे - ०७**

**संदर्भ क्र. शै.पा./४०** **दिनांक ०८/०२/२०२३**

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांना/ संस्थांना शैक्षणिक पात्रता यादीत दुरूस्ती अथवा बदल करावयाचे असल्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांना/संस्थांना शैक्षणिक पात्रता यादीत

१. विद्यार्थ्यांच्या चुकलेल्या नावात दुरूस्ती/जन्म तारखेतील बदल/प्रवर्गातील बदल,
(Student Name Change Request)
२. संस्था बदल झाल्यावर पात्रता नंबर स्थलांतर करणे,
(Student Transfer Request)
३. अभ्यासक्रम बदल करणे,
(Student Change Course Request)
४. विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करणे.
(Student Cancel Admission Request)

यांप्रमाणे दुरूस्ती अथवा बदल करावयाचे असल्यास प्रत्येक आवेदनासाठी प्रत्येकी रू. १००/- याप्रमाणे दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ पासून ऑनलाईन पध्दतीने शुल्क आकारण्यात येत आहे, याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

8/2/2023

सहायक कुलसचिव
शैक्षणिक पात्रता विभाग

**(टिप : -** तसेच सदर ऑनलाईन रिक्वेस्ट पाठविताना महाविद्यालयाने अचूक पाठविणे अपेक्षित आहे. कारण प्रत्येक आवेदनासाठी शुल्क आकारण्यात येणार असल्याने रिक्वेस्ट पाठविण्यापूर्वी पात्रतेच्या लॉग इन आयडी मध्ये नमूद नियमावलीचे अवलोकन करण्यात यावे.)

## ❖ ऑनलाईन रिक्वेस्ट पाठविण्यासंबंधी नियमावली

### १. विद्यार्थ्यांच्या चुकलेल्या नावात दुरूस्ती/जन्म तारखेतील बदल/प्रवर्गातील बदल :-
**(Student Name Change Request)**

यासंदर्भातील रिक्वेस्ट पाठविताना मा. प्राचार्य/संचालक यांच्या सहीचे पत्र तसेच दुरूस्तीसाठी आवश्यक पुरावा म्हणून कागदपत्रे (नावात दुरूस्तीसाठी इ. १२ वीचे गुणपत्रक, गॅझेट, विवाह नोंदणी प्रमाणपत्र/जन्म तारखेतील बदलासाठी शाळा सोडल्याचा दाखला किंवा Birth Certificate/ प्रवर्गातील बदल असल्यास Caste Certificate) स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे व Student Details अचूक भरून Student Name Correction Request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Name Correction Request)

### २. संस्था बदल झाल्यावर पात्रता नंबर स्थलांतर करणे :-
**(Student Transfer Request)**

एखाद्या विद्यार्थ्याने पुणे विद्यापीठाअंतर्गत प्रथम वर्ष पदवी/पदव्युत्तर पदवी एका कॉलेज/ संस्थेत प्रवेश घेऊन नंतर दुस-या किंवा पुढच्या वर्षासाठी पुणे विद्यापीठाअंतर्गतच त्याची कॉलेज किंवा संस्था बदल असल्यास अशा विद्यार्थ्याचा पात्रता क्रमांक स्थलांतरीत (त्याच पदवी/पदव्युत्तर पदवी करीता) करून घेणेबाबत मा. प्राचार्य/ संचालक यांच्या सहीचे पत्र स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे.

तसेच ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे DTE व DHE मार्फत **स्थलांतर** होत असतात अशा विद्यार्थ्यांच्या रिक्वेस्ट पाठविताना (DTE व DHE) चे पत्रदेखील अपलोड करावे.

त्याचप्रमाणे पात्रता नंबर स्थलांतर करताना संबंधित विद्यार्थ्याची त्या अभ्यासक्रमाची terms शिल्लक आहे की नाही याबाबत प्रथम परीक्षा विभागात चौकशी करून त्यानंतर ती रिक्वेस्ट पाठवावी व तसा स्पष्ट उल्लेख (परीक्षा विभागात चौकशी केली असता सदर विद्यार्थ्याची अभ्यासक्रमाची terms शिल्लक आहे.) मा.प्राचार्य/संचालक यांच्या सहीच्या पत्रात करण्यात यावा व Student Details भरून Student Transfer Request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Transfer Request)

### ३. अभ्यासक्रम बदल करणे :-
**(Student Change Course Request)**

एखाद्या विद्यार्थ्याने पुणे विद्यापीठाअंतर्गत कॉलेज/ संस्थेत प्रथम वर्ष पदवी/पदव्युत्तर पदवीस प्रवेश घेऊन नंतर दुस-या किंवा पुढच्या वर्षासाठी त्याचा अभ्यासक्रमात बदल होत असल्यास अशा विद्यार्थ्याचा पात्रता क्रमांक तोच ठेवून त्याचा अभ्यासक्रम बदल करणेबाबत मा. प्राचार्य/ संचालक यांच्या सहीचे पत्र स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे.

तसेच ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे DTE व DHE मार्फत होत असतात अशा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात बदलाबाबत रिक्वेस्ट पाठविताना सोबत (DTE व DHE) चे अभ्यासक्रम बदलाचे पत्रदेखील अपलोड करावे. व Student Details भरून Student Change Course Request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Change Course Request)

## ४. विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करणे :-
**(Student Cancel Admission Request)**

एखाद्या विद्यार्थ्याने कॉलेज/ संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर त्याची शैक्षणिक पात्रता झाली असेल व त्याला पात्रता क्रमांक मिळाला असेल अशा विद्यार्थ्याचा प्रवेश त्या विद्यार्थ्याने काही कारणास्तव रद्द करण्याची विनंती केली असेल अशा केसेस देखील ऑनलाईन **Request** मधूनच पाठविण्यात याव्यात. सोबत मा.प्राचार्य/संचालक यांच्या सहीचे पत्र व विद्यार्थ्याने प्रवेश रद्द करण्यासाठी दिलेला अर्ज स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे व Student Details भरून Student Cancel Admission Request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Cancel Admission Request)